महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा २०१९ (लिपिक-टंकलेखक, दुय्यम निरीक्षक व कर सहायक) - पेपर क्र. १ (संयुक्त पेपर)

प्रश्नपुस्तिका क्रमांक परीक्षा दि. ०६/१०/१९ 2019

**BOOKLET No.**

**013** संच क्र. **A**

104037

# प्रश्नपुस्तिका - I

## मराठी व इंग्रजी

**वेळ : 1 (एक) तास**

**एकूण प्रश्न : 100**

**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. जो वाईट कृत्य करतो त्याच्या मनात सतत त्याची सल डाचत राहते. या संदर्भाची समर्पक म्हण ओळखा.

अ. चोराच्या मनात चांदणे ब. जशी देणावळ तशी धुळावळ

क. खाई त्याला खवखवे ड. पेरावे तसे उगवते

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

---

2. 'बारभाईंचे कारस्थान' या म्हणीचा अचूक अर्थ सांगा.

अ. अनेक लोक एकत्र आले की, एकमेकांविषयी सल्लामसलत करतात.

ब. कारभारी एकत्र येऊन काम करतात, तेव्हा कटकारस्थान होते.

क. अनेकांनी मिळून धंदा सुरु केला, की धंदयाची वाट लागून जाते.

ड. एका कामाची चिंता करणारे अनेक असल्यास कामात मोडता घालणारे काहीजण निपजतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व ब बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

---

3. सचिन व अनिल यांचे स्वभाव पाहता त्यांची दाट मैत्री होणे शक्य आहे. या स्पष्टीकरणासाठी योग्य वाक्प्रचार कोणता ?

(1) मेतकूट जमणे (2) मोट बांधणे

(3) एकजूट होणे (4) जुळून येणे

---

4. 'क्षमा करणे' या अर्थाचा वाक्प्रचार कोणता ?

अ. पोटात घालणे ब. पोटात ठेवणे

क. पोटाशी घेणे ड. पोट बांधणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक (2) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक (4) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक

---

5. मी पत्र वाचतो. या साधा वर्तमानकाळ असलेल्या वाक्याचे रीती भूतकाळात रूपांतर कसे होईल ?

(1) मी पत्र वाचले. (2) मी पत्र वाचत असे.

(3) मी पत्र वाचत होतो. (4) मी पत्र वाचत असेन.

**6.** शाळांतून सहशिक्षण दिले पाहिजे हा मुद्दा आता वादाचा नाही. या वाक्यातील उद्देश्यविस्तार ओळखा.

अ. वादाचा
ब. हा
क. दिले
ड. मुद्दा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक
(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

---

**7.** मिश्र वाक्यातील गौण वाक्य कोणत्या अव्ययांनी जोडली जातात ?

(1) शब्दयोगी अव्यय
(2) क्रियाविशेषण अव्यय
(3) उभयान्वयी अव्यय
(4) उद्‌गारवाचक अव्यय

---

**8.** कोणत्या शब्द जातीत लिंग, वचन किंवा विभक्ती यामुळे बदल होत नाही.

अ. आता, उद्या, इथे, इकडे (क्रियाविशेषणे)
ब. मागे, पुढे, करिता, साठी (शब्दयोगी)
क. आणि, अथवा, परंतु, म्हणून (उभयान्वयी)
ड. अरेरे, शब्बास, अबब, ओहो (केवळप्रयोगी)

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त अ, ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

**9.** अर्थानुसार विधानार्थी वाक्य कोणती ?

अ. सचिन तेंडुलकर उत्तम फलंदाज आहे. (होकारार्थी – वर्तमानकाळ)
ब. विटीदांडूचा खेळ अलीकडे कुठे दिसला नाही. (नकारार्थी – वर्तमानकाळ)
क. विद्यार्थ्यांनी वर्गात शांतता राखावी. (होकारार्थी – विध्यर्थ)
ड. मुलांनो, वर्गात शांतता राखा. (होकारार्थी – विध्यर्थ)

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त अ, ब व क बरोबर बाकी सर्व चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

**10.** त्याच्याने काम करवते. या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) नवीन कर्मणी
(2) समापण कर्मणी
(3) शक्य कर्मणी
(4) प्रधानकर्तृक कर्मणी

---

11. प्रचलित शुद्धलेखनानुसार अचूक असलेले शब्दगट ओळखा.

अ. तत्त्वनिष्ठ, तकलुबी, तरंगिणी
ब. तत्त्वज्ञान, तिडीक, तुणतूणे
क. तनुजा, तद्रूप, त्रेधातिरपिट
ड. तालूका, ताबित, तत्त्वनिष्ठ

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक
(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

---

12. नामानंतर येऊन विधानाचा अर्थ पूर्ण करणाऱ्या विशेषणाला काय म्हणतात ?

अ. अव्ययसाधित विशेषणे
ब. नामसाधित विशेषणे
क. विधिविशेषणे
ड. गुणविशेषणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व ड बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(4) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

---

13. रेघ + ओटी = रेघोटी हे कोणत्या संधीचे उदाहरण आहे ?

(1) पररूपसंधी (2) पूर्वरूपसंधी (3) व्यंजनसंधी (4) विसर्गसंधी

---

14. 'घड्याळाने पाच वाजल्याचे दर्शविले' या वाक्यातील ध्वन्यार्थ ओळखा.

(1) अभिधा – वाच्यार्थ
(2) लक्षणा – लक्षार्थ
(3) व्यंजना – व्यंग्यार्थ
(4) रूढी लक्षणा – लक्षण-लक्षार्थ

---

15. सिद्ध शब्दांचा गट ओळखा.

अ. वैष्णव, लाकडी
ब. सुर्य, धोंडा
क. कागदी, घर
ड. कर, बोल

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व ड बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक
(4) फक्त क व ड बरोबर बाकी सर्व चूक

---

16. 'पक्ष' शब्दाचा योग्य अर्थ असलेले शब्द वापरून तयार केलेली वाक्ये ओळखा.

अ. त्याची बाजू भक्कम आहे.
ब. तो गट करून राहतो.
क. मोराचे पंख सुंदर असतात.
ड. हा पंधरवडा चांगला गेला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व ब बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त क व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त अ, ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

**17.** 'रान' या शब्दाचे समानार्थी शब्द ओळखा.

अ. विपिन ब. अरण्य क. कांतार ड. कानन

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त ब व ड बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त ब, क व ड बरोबर बाकी सर्व चूक
(4) सर्व पर्याय बरोबर आहेत

---

**18.** 'भुंगा' या शब्दाच्या समानार्थी शब्द वापरून तयार केलेली वाक्ये अचूक ओळखा.

अ. विलास बागेत फिरतो.
ब. मिलिंद गाणे गुणगुणत होता.
क. रमन येथे दिसत नाही.
ड. अली अजून आला नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क अचूक आहे, बाकी सर्व चूक
(2) फक्त क व ड अचूक आहे, बाकी सर्व चूक
(3) फक्त ब व ड अचूक आहे, बाकी सर्व चूक
(4) फक्त अ अचूक आहे, बाकी सर्व चूक

---

**19.** 'साहित्यातील अश्लीलता' या विषयावरील निबंध कोणत्या निबंध प्रकारात येतो ?

(1) वैचारिक निबंध
(2) वर्णनात्मक निबंध
(3) वाङ्मयीन निबंध
(4) लघु निबंध

---

**20.** बोलतांना एखादे वाक्य तुटल्यास स्पष्टीकरण द्यावयाचे झाल्यास __________ या विरामचिन्हाचा वापर करतात.

(1) स्वल्पविराम
(2) अर्धविराम
(3) संयोगचिन्ह
(4) अपसरणचिन्ह

---

**21.** 'श्रीकृष्णाने सांदीपनींना गुरुदक्षिणा दिली' या वाक्यातील 'सांदीपनींना' हा शब्द व्याकरणिक दृष्ट्या काय सुचवितो ?

(1) आदरार्थी अनेकवचन
(2) सामान्य नाम
(3) क्रियापदाचा कर्ता
(4) पुल्लिंग, तृतीया एकवचन

---

**22.** संयुक्त वाक्य ओळखा.

(1) रजनीला जेव्हा बरं वाटेल तेव्हा ती काम करील.
(2) रजनी जेव्हा माहेरी गेली तेव्हा भाऊंनी पुन्हा ते शब्द उच्चारले.
(3) रजनी जेव्हा दिसली तेव्हा भाऊंचे मन मोकळे झाले.
(4) रजनी हुषार आणि कर्तबगार आहे.

---

**23.** व्यंजन संधीचे उदाहरण ओळखा.

(1) चिदानंद
(2) तपोधन
(3) कवीश्वर
(4) दुरात्मा

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**24.** खाली दिलेल्या विधानातून बरोबर असणाऱ्या विधानाचा योग्य पर्याय लिहा.

(1) विशेषण = वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द

(2) समास = दोन किंवा अधिक शब्द एकत्र येण्याची क्रिया

(3) उद्देश्य = नामाबद्दल विशेष माहिती सांगणारा शब्द

(4) प्रयोग = सामासिक शब्दाची फोड करून दाखविण्याची क्रिया

---

**25.** खाली दिलेल्या शब्दातून तेलगू भाषिक शब्द ओळखा.

(1) अनरसा (2) रिकामटेकडा (3) मठ्ठा (4) विळी

---

**26.** जा, ये, कर, बस, बोल, पी – या सारख्या मराठी भाषेतील मूळ धातूंना ________ म्हणतात.

(1) साधित शब्द (2) सिद्ध शब्द (3) देशी शब्द (4) तत्सम शब्द

---

**27.** उद्देश्य वर्तमानकाळाचे उदाहरण ओळखा.

(1) सुधा निबंध लिहिते. (2) सुधा निबंध लिहीत आहे.

(3) सुधाने निबंध लिहिला आहे. (4) सुधा निबंध लिहिणार आहे.

---

**28.** गुणदर्शक विशेषणाचे उदाहरण ओळखा.

(1) गडद अंधारात सुद्धा प्रकाशबिंदू दिसला.

(2) गावाला जातांना जवळ पैसे असावेत.

(3) नवऱ्याशी आपण स्वत:हून बोलायचे नाही असे तिने ठरविले होते.

(4) हे फुलवेड घेऊनच माई सासरी गेल्या.

---

**29.** व्याकरणिक दृष्ट्या शुद्ध वाक्य ओळखा.

(1) लताबाईच्या गायणाने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.

(2) लताबाईंच्या गायनाणे सर्वानांच मंत्रमूग्ध केले.

(3) लताबाईंच्या गायनाने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.

(4) लताबाईच्या गायणाणे सर्वानाच मंत्रमुग्ध केले.

---

**30.** पोर, मूल ही संज्ञा मराठीत कोणत्या लिंगी वापरली जातात ?

(1) फक्त पुल्लिंगी, स्त्रीलिंगी (2) फक्त पुल्लिंगी, नपुंसकलिंगी

(3) पुल्लिंगी, स्त्रीलिंगी, नपुंसकलिंगी (4) फक्त नपुंसकलिंगी

**31.** मराठी व्याकरणात इ, उ, ऋ या बद्दल अनुक्रमे य्, व्, र् असे आदेश होतात. त्यांना ________ म्हणतात.

(1) संप्रसारण (2) वृद्धयादेश

(3) यणादेश (4) सजातीय स्वरसंधी

---

**32.** खाली दिलेल्या वाक्यांमधून अयोग्य असलेल्या पर्यायी उत्तराची अचूक निवड करा.

(1) व्यंजनात स्वर मिसळून अक्षर बनते.

(2) ज्या वर्णाचा उच्चार स्वरांच्या साहाय्यावाचून पूर्ण होत नाही, त्यांना व्यंजने म्हणतात.

(3) दीर्घस्वर व संयुक्तस्वर यांचा उच्चार करण्यास दीर्घश्वास घ्यावा लागतो.

(4) स्पष्ट व खणखणीत उच्चारांना अनुस्वार असे म्हणतात.

---

**33.** मध्यमपदलोपी समासाची उदाहरणे ओळखा.

(1) आईवडील, कौरवपांडव (2) चहापाणी, भाजीपाला

(3) बरेवाईट, खरेखोटे (4) बटाटेभात, पुरणपोळी

---

**34.** 'समाजातील परिस्थिती बदलून तिला योग्य वळण लावणारा' या शब्दसमुहाबद्दल असलेल्या योग्य शब्दाच्या पर्यायाची अचूक निवड करा.

(1) धर्मसंस्थापक (2) नवमतवादी

(3) युगप्रवर्तक (4) साम्यवादी

---

**35.** प्राजक्ता नुकतीच स्वयंपाक करायला शिकू लागली होती. पण ती तिच्या मैत्रिणीं मध्ये 'मी सर्व स्वयंपाक उत्कृष्ट बनविते. मला सर्व पदार्थ चविष्ट बनविता येतात' — अशा बढाया मारायची. या वाक्य समुहासाठी खाली दिलेल्या म्हणीतून योग्य म्हणीचा पर्याय निवडा.

(1) एक ना धड भाराभार चिंध्या

(2) उचलली जीभ लावली टाळूला

(3) उथळ पाण्याला खळखळाट फार

(4) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

---

**36.** आवृत्तिवाचक संख्या विशेषणाचे उदाहरण ओळखा.

(1) भावाने आणलेला शालू पाहून रत्नाचा आनंद द्विगुणित झाला.

(2) प्रभावतीच्या साड्या म्हणजे पैठणीच असतात.

(3) वर्षा आपल्या साड्या कपाटात नीट रचून ठेवते.

(4) अलकाने कालच साड्या ठेवण्यासाठी कपाट आणले.

---

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची (प्र.क्र. 37 ते 41) योग्य ती उत्तरे लिहा.**

माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व त्याच्या स्वरूपांत विविधता आणण्याच्या दृष्टीनें केलेली उपाययोजना यांच्या बाबतींतहि अशाच प्रकारची अनुकूल प्रतिक्रिया आढळते. परंतु महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाचा प्रश्न आला कीं मतभेदांना सुरुवात होते. गेल्या दहा वर्षांत विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या संख्येंत जी विलक्षण वाढ झाली तिच्या इष्टतेबद्दल अनेकांनीं शंका व्यक्त केली आहे. या वाढीचा परिणाम शिक्षणसंस्थांतून बेसुमार गर्दी होण्यांत झाला असून त्यामुळें अनेक शैक्षणिक दोष उत्पन्न झाले आहेत असें सांगण्यांत येतें. आमच्या महाविद्यालयांत व विद्यापीठांत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं अनेकांत उच्च शिक्षण घेण्याची कुवतच नसल्यामुळें त्यांना आपला शिक्षणक्रम अर्धवटच सोडावा लागतो. त्यामुळें आपली पुष्कळशी सामाजिक शक्ति आज वाया जात असते. विद्यार्थ्यांच्या या वाढत्या संख्येमुळें इमारती, प्रयोगशाळा, वाचनालयें यांच्यावरही फार ताण पडत असल्यामुळें कोणाचीच पुरेशी सोय होऊं शकत नाहीं. विद्यार्थ्यांना त्यांच्या संख्येच्या मानानें सांघिक जीवनाच्या ज्या संधी मिळावयास पाहिजेत त्या पण दिवसेंदिवस कमी होत आहेत, आणि शिक्षक-विद्यार्थी संबंधही दुरावत चालले आहेत. शिक्षणाचा दर्जा अशा रीतीनें खालावत आहें, आणि पदव्या मिळविण्यासाठीं विद्यार्थ्यांना निरनिराळ्या सोयी उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांमध्ये केवळ पदव्यांचा हव्यास निर्माण करण्याकडे महाविद्यालयांचा व विद्यापीठांचा कल वाढत असल्याचें दिसत आहे. महाविद्यालयांत पाळीपाळीनें वर्ग चालविणें, संध्याकाळचीं व रात्रीचीं महाविद्यालयें सुरू करणें, बहिःशाल पदव्या देणें, पत्रव्यवहाराच्या द्वारा अभ्यासक्रमाच्या योजना सुरू करणें, या सर्वांमधून हीच प्रवृत्ति व्यक्त होते. या सर्व गोष्टींमुळे विद्यापीठांकडून अपेक्षित असलेलें ज्ञानदानाचें खरें कार्य होत नसून तीं केवळ पदव्यांचा पुरवठा करणाऱ्या पेढ्या बनत आहेत, असें आज कित्येकांना वाटूं लागलें आहे. संख्या आणि विस्तार यांच्या वेदीवर गुणांचा बळी दिला जात आहे.

केवळ पदव्यांच्याच मागें धाव घेण्याच्या विद्यार्थ्यांमधील या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठीं काय उपाययोजना करावी या संबंधीं अनेक वेळां चर्चा होते. आणि कांहीं वेळां विद्यापीठांतील प्रवेश मर्यादित करण्याच्या दृष्टीनें किंवा केवळ पदवी मिळविण्याच्या उद्देशानेंच विद्यापीठांत येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या निश्चयापासून परावृत्त करण्याच्या दृष्टीनें कांहीं उपायही योजले जातात. विद्यापीठांतील प्रवेशावर या ना त्या स्वरूपांत निर्बंध घालणें हा वरील उपायांपैकीं पहिल्या प्रकारचा उपाय असून विद्यापीठांच्या पदव्या व कनिष्ठ नोकऱ्या यांचा संबंध तोडणें हा दुसऱ्या प्रकारचा उपाय आहे. विद्यार्थ्यांचा विद्यापीठांकडे वाहणारा प्रचंड ओघ थांबविण्यास हे उपाय कितपत यशस्वी होतील याबद्दल शंकाच आहे. तसेंच याच उद्देशानें माध्यमिक शिक्षणांत आणलेली विविधता प्रत्यक्षांत कितपत उपयोगी पडेल हें सांगणें कठीण आहे. या प्रयत्नांना यश येण्याची एकंदरीनें शक्यता कमीच दिसते. माध्यमिक शिक्षणाचा झपाट्यानें होत असलेला प्रसार हें त्याचें एक महत्त्वाचें कारण असून त्यामुळें विद्यापीठांतील विद्यार्थ्यांची गर्दी कांहीं काळ तरी अशीच वाढत जाणार आहे. म्हणून विद्यापीठांतील शिक्षणानें ज्यांचा फायदा होऊं शकेल. परंतु केवळ गरिबीमुळेंच जे उच्च शिक्षणाचा लाभ घेऊं शकत नाहींत अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठांतून प्रवेश मिळण्यासाठीं आवश्यक त्या सुधारणा होणें इष्ट आहे. निरनिराळ्या शिष्यवृत्त्या ठेवून मर्यादित प्रमाणांत आज ही गरज भागविली जात आहे. परंतु आवश्यक ती पात्रता किंवा कुवत नसतांनाहि जे महाविद्यालयांत किंवा विद्यापीठांत प्रवेश मिळवूं इच्छितात त्यांना तेथें सहज प्रवेश मिळत असल्यामुळें तेथील विद्यार्थ्यांच्या संख्येंत जी बेसुमार वाढ झाली आहे त्याचाच आज आपणांस विचार करावयास पाहिजे.

**37.** विद्यापीठाकडून ज्ञानदानाचे खरे काम न होण्याचे कारण

अ. विद्यापीठे पदव्यांचा पुरवठा बनवणाऱ्या पेढया बनत आहेत.

ब. विद्यार्थ्यांना अधिक गुण दिले जातात.

क. विद्यार्थ्यांत शिक्षण घेण्याची कुवतच नसते.

ड. विद्यार्थ्यांची संख्या आणि विस्तार या वेदीवर गुणांचा बळी दिला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त ब आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त अ आणि क बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ड आणि क बरोबर बाकी सर्व चूक

---

**38.** पदव्यांमागे धावणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तीस आळा कसा घालता येईल ?

अ. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना संख्येची मर्यादा घालावी.

ब. फक्त पदवी मिळविण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

क. विद्यापीठाच्या पदव्यांपासून विद्यार्थ्यांना परावृत्त करावे.

ड. विद्यापीठाच्या पदव्या व कनिष्ठ नोकऱ्या यांचा संबंध तोडावा.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त अ आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त क बरोबर बाकी सर्व चूक

---

**39.** शिक्षणसंस्थांमधे बेसुमार गर्दी होण्याचे कारण

अ. शिक्षणाचा प्रसार झाला आहे.

ब. शैक्षणिक दोष निर्माण झाले आहेत.

क. विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या संख्येत विलक्षण वाढ झाली आहे.

ड. अनेकांनी शिक्षणक्रम अर्धवट सोडला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ आणि ब बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त क आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त ब आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

**40.** विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या बेसुमार गर्दीपेक्षा आवश्यक गोष्ट म्हणजे

अ. विद्यार्थ्यांमध्ये पदव्यांचा हव्यास निर्माण करणे.

ब. विद्यार्थ्यांना त्यांच्या संख्येच्या मानाने सांघिक जीवनाच्या संधी देण्याची आवश्यकता.

क. विविध प्रकारचे अभ्यासक्रम सुरू करणे.

ड. विद्यार्थी-शिक्षक संबंध सुधारणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक

(2) फक्त अ आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(3) फक्त ब आणि ड बरोबर बाकी सर्व चूक

(4) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

---

**41.** उताऱ्याला योग्य शीर्षक कोणते देता येईल ?

अ. शिक्षणाचा दर्जा

ब. शिक्षणाची कुवत

क. दिवस व रात्रीची महाविद्यालये

ड. अर्धवट शिक्षणक्रम

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त ड बरोबर इतर सर्व चूक

(2) फक्त क बरोबर इतर सर्व चूक

(3) फक्त ब बरोबर इतर सर्व चूक

(4) फक्त अ बरोबर इतर सर्व चूक

42. 'पगडी' या शब्दाचे नपुंसकीलिंगी रूप ओळखा.
(1) पगडे (2) पागोडे (3) पागोटे (4) यापैकी एकही नाही

43. 'मंग्यारो' या शब्दाचा अर्थ ओळखा.
(1) बांबूपासून बनविलेली शिडी
(2) गवत वाळत घालण्याचे अवजार
(3) पाणी शिंपडण्यासाठी वापरले जाणारे अवजार
(4) गवत, पतेरा गोळा करण्यासाठीचे अवजार

44. 'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत' या वाक्यातील 'साप' या शब्दाचा वाच्यार्थाने वापर केलेले वाक्य कोणते ?
(1) लोकांना चावू नयेत म्हणून साप ठेचावेत. (2) सापांना पकडुन जंगलात सोडावे.
(3) साप म्हणजे दुष्ट प्रवृत्तीची माणसे. (4) साप म्हणजे एक सरपटणारा प्राणी.

45. खालील पर्यायांमधील तद्भव शब्द ओळखा.
(1) विद्वान (2) कोवळा (3) यद्यपि (4) जल

46. 'पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर' या काव्यपंक्ती शब्दशक्तीमधील कोणत्या प्रकारातील आहेत ?
(1) अभिधा (2) लक्षणा
(3) लक्षणामूलक व्यंजना (4) अभिधामूलक व्यंजना

47. 'सुश्रुषा' या शब्दाचे शुद्ध शब्दरूप खालील पर्यायांतून ओळखा.
(1) शुश्रूषा (2) सुश्रूषा (3) सुश्रूशा (4) शुश्रुषा

48. 'कशात नाय काजू आणि बायत नाय राजू' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(1) नुकसानाशिवाय संकटाचे परिमार्जन होणे
(2) एखाद्या विपरीत परिस्थितीत नातेवाईक विसरणे
(3) कोणत्याही गोष्टी आपल्या हातात नसणे
(4) काही गोष्टी दुर्लक्षित करणे

49. 'त्याला बिचाऱ्याला' हे उदाहरण कोणत्या विशेषणाचा प्रकार आहे ?
(1) संख्यावाचक विशेषण (2) सार्वनामिक विशेषण
(3) संबंधी विशेषण (4) अधि-विधी विशेषण

50. अर्ज, कसब, खर्च, तमाशा मराठी भाषेने हे शब्द कोणत्या भाषेकडून स्वीकारले आहेत ?
(1) फार्शी (2) अरबी (3) पोर्तुगीज (4) फ्रेंच

**51.** 'कवि + ईश्वर' हा शब्द कोणत्या संधीचे उदाहरण आहे ?
(1) स्वर संधी (2) व्यंजन संधी (3) विसर्ग संधी (4) यापैकी नाही

**52.** मूळ शब्दाच्या मागे जोडल्या जाणाऱ्या एका अक्षराला किंवा अधिक अक्षरांना काय म्हणतात ?
(1) प्रत्यय (2) कृदन्त (3) तत्सम शब्द (4) उपसर्ग

**53.** 'निरोगी' हा शब्द कोणत्या साधित प्रकारातील आहे ?
(1) उपसर्गघटित साधित शब्द (2) अंशाभ्यस्त शब्द
(3) पूर्णाभ्यस्त शब्द (4) तद्भव शब्द

**54.** 'तू तर चाफेकळी' बालकवींच्या कवितेतील या पंक्ती कोणत्या शब्दशक्तीचे उदाहरण आहे ?
(1) अभिधा (2) लक्षणा (3) निरूठा (4) व्यंजना

**55.** 'उत्कर्ष' या शब्दासाठी समानार्थी शब्द ओळखा.
(1) अभ्युदय (2) अमाप (3) उदय (4) कमाल

**56.** एकापेक्षा अधिक केवळ वाक्ये उभयान्वयी अव्ययाने जोडली जाऊन त्यांचे एकत्रित बनलेले वाक्य म्हणजे काय ?
(1) मिश्र वाक्य (2) केवळ वाक्य
(3) संयुक्त वाक्य (4) यापैकी नाही

**57.** 'पाखरे घरट्यात परतली', या विधानातील क्रियापदावरुन प्रयोग ओळखा.
(1) अकर्मक कर्तरी प्रयोग (2) सकर्मक कर्तरी प्रयोग
(3) भावे प्रयोग (4) सकर्मक भावे प्रयोग

**58.** च, हि, ना, सुद्धा, फक्त, देखील ही कोणती अव्यये आहेत ?
(1) क्रियाविशेषण अव्यय (2) शब्दयोगी अव्यय
(3) केवळप्रयोगी अव्यय (4) उभयान्वयी अव्यय

**59.** 'धातूंना प्रत्यय लागून जे साधित शब्द तयार होतात', त्यांना काय म्हणतात ?
(1) उपसर्ग (2) शब्दयोगी अव्यय
(3) प्रत्यय (4) कृदन्ते

**60.** 'रामाने नलाकडून सेतू बांधविला', वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.
(1) प्रयोजक क्रियापद (2) शक्य क्रियापद
(3) सिद्ध क्रियापद (4) भावकर्तृक क्रियापद

**61.** Choose the **correct** alternative and complete the following sentence :

Please ________ this oil lamp.

(1) blow down
(2) blow out
(3) blow up
(4) blow off

---

**62.** Point out the sentences that are without any idiom.

a. Ph.D. in Mathematics is the best feather in his cap.

b. The idle and lazy persons are busy building castles in the air.

c. To expect every kind of help from the government is nothing but living in the fool's paradise.

d. His apprenticeship in the foreign company was a blessing in disguise.

**Answer options :**

(1) a and b
(2) c and d
(3) All of these
(4) None of these

---

**63.** Point out the idiomatic sentences.

a. Exploiting the employees has now become a fun and game in the so called modern Educational Institutes.

b. Most of the inexperienced ministers act under the thumb of the secretaries in the Ministry.

c. Insecticides and pesticides can never be made null and void even though we wash vegetables repeatedly.

d. Mahatma Gandhi was very shy and trembling when he made his maiden speech.

**Answer options :**

(1) a and b
(2) c and d
(3) b, c and d
(4) All of these

---

64. He is always picking holes in every project.

Identify the **correct** meaning of the underlined words.

(1) Asking irrelevant questions on

(2) Suggesting improvements in

(3) Creating problems in

(4) Finding fault with

---

65. Point out the **correct** sentences.

a. Will you convey my apologies to your grandparents.

b. Is it bad to be hostile to the persons who help us !

c. Pointing to others for our own mistakes is a dangerous habit, isn't it ?

d. For years he has been listening to the advertisement – 'Tobacco chewing is injurious to health', and still he continues to chew it.

**Answer options :**

(1) a and b (2) c and d

(3) All of these (4) None of these

---

66. Find out objective personal pronouns from the following :

I, We, My, Our, Me, Thou, Us, You, Thee, Your

(1) I, We, My, Our, Thou

(2) I, We, My, Your

(3) Me, Us, Thee, You

(4) None of the above

---

67. The word nearest in meaning to the key word "incredible" is ________ .

a. unbelievable b. unconvincing

c. conceivable d. creditable

**Answer options :**

(1) a, b and c (2) b, c and d

(3) a and b (4) All of these

**68.** a. Almost each visitor stopped and stared.

b. I go to the dentist every six months.

c. The entire building has recently been renovated.

Identify the **incorrect** sentence from the above.

(1) Only a (2) Only b

(3) Only c (4) None of the above

---

**69.** The word nearest in meaning to the key word "wrong" is __________ .

a. incorrect b. false

c. accurate d. untrue

**Answer options :**

(1) a, b and d (2) None of these

(3) a and c (4) b and d

---

**70.** Emma ________ Graham when she was going out with his friend.

Choose the **correct** alternative to complete the sentence.

(1) meets (2) has met (3) met (4) had met

---

**71.** Choose the **correct** passive sentence of the following statement :

She brought him a new umbrella.

(1) A new umbrella had been brought for him.

(2) A new umbrella was brought for him.

(3) She had been brought a new umbrella.

(4) A new umbrella was to be brought for him.

---

**72.** a. She got up when the alarm clock went off.

b. We visited Spain three times last year.

Choose the **correct** sentence from the options given above.

(1) Both the sentences are incorrect

(2) Only a is correct

(3) Only b is correct

(4) Both the sentences are correct

---

**73.** Select the word or group of words that is opposite in meaning to the word given below :

"Disparage"

(1) Criticize
(2) Cajole
(3) Justify
(4) Honour

**74.** Fill in the blanks with 'a' or 'an'.

a. ________ universal problem.

b. ________ eucalyptus tree.

c. ________ UNESCO worker.

(1) a – a, b – an, c – a

(2) a – a, b – a, c – a

(3) a – an, b – a, c – a

(4) None of the above

**75.** a. This book resembles to that.

b. Have you signed that contract ?

c. A modest man does not boast of his merits.

d. He carefully investigated into the case.

Identify the **correct** sentences.

(1) Only a and c

(2) Only b and c

(3) Only a and d

(4) Only b and d

**76.** 'Bon voyage' means ________ .

(1) wishing you a happy journey

(2) according to the value

(3) Both (1) and (2)

(4) None of the above

77. a. Unless it will rain. I will pick you up at 6.00.

b. If you don't pass the test, what will you do ?

c. Take another sandwich if you are hungry.

Choose the **correct** sentence/s.

(1) Only a
(2) Only b
(3) Only a and b
(4) Only b and c

---

78. Ashoka was one of the greatest Indian rulers.

Identify the **correct** positive degree of the above sentence.

(1) Very few Indian rulers were as great as Ashoka.
(2) No other Indian ruler was as great as Ashoka.
(3) Some Indian rulers were as great as Ashoka.
(4) Ashoka was greater than many other rulers in India.

---

79. Arsenic is an extremely poisonous element.

Identify the **correct** positive degree of the above sentence.

(1) Arsenic is a highly poisonous element.
(2) Arsenic is one of the highly poisonous elements.
(3) Very few elements are as poisonous as Arsenic.
(4) Most of the elements are less poisonous than Arsenic.

---

80. 'To bite the bullet' means

(1) to try very hard
(2) to accept something unpleasant without complaining
(3) to state your opinion
(4) biting the bullet

---

81. Vinita is on cloud nine after winning the final match. The underlined phrase means

(1) to be very happy
(2) to be very angry
(3) to be fond of somebody
(4) None of the above

---

**82.** Identify the **correct** sentence/s.

a. She described me the situation.

b. We all envied him his lifestyle.

c. He fixed the tap for me.

**Answer options :**

(1) Only a
(2) Only b
(3) Only a and c
(4) Only b and c

---

**83.** He got through his exam all right.

The underlined word means

(1) he reached the exam hall
(2) he passed the exam
(3) Both (1) and (2)
(4) None of the above

---

**84.** Complete the following sentence by choosing the **correct** alternative :

A stoic is a person who

(1) is in charge of the goods of a company
(2) buys and sells the stocks and shares
(3) does not endure anything painful and unpleasant
(4) silently suffers and endures without any complaints

---

**85.** He said to me, "Why did you strike me ?"

Select the **correct** indirect narration of the above sentence.

(1) He inquired to me why did I strike him.
(2) He inquired of me why I had struck him.
(3) He asked me why did I strike him.
(4) He said me that why I struck him.

**Read the following passage carefully and answer the questions (Question nos. 86 to 90) given below it.**

There is a fairly universal sentiment that the use of nuclear weapons is clearly contrary to morality and that its production probably so, does not go far enough. These activities are not only opposed to morality but also to law and if the legal objection can be added to the moral, the argument against the use and the manufacture of these weapons will considerably be reinforced. Now the time is ripe to evaluate the responsibility of scientists who knowingly use their expertise for the construction of such weapons which has deleterious effect on mankind.

To this must be added the fact that more than 50 percent of the skilled scientific manpower in the world is now engaged in the armaments industry. How appropriate it is that all this valuable skill should be devoted to the manufacture of weapons of death in a world of poverty is a question that must touch the scientific conscience.

A meeting of Biologists on the Long-Term Worldwide Biological Consequences of Nuclear War added frightening dimension to those forecasts. Its report suggested that the long biological effects resulting from climatic changes may at least be as serious as the immediate ones.

Sub-freezing temperatures, low light levels, and high doses of ionising and ultraviolet radiation extending for many months after a large-scale nuclear war could destroy the biological support system(s) of civilisation, at least in the Northern Hemisphere. Productivity in natural and agricultural ecosystems could be severely restricted for a year or more. Post-war survivors would face starvation as well as freezing conditions in the dark and be exposed to near-lethal doses of radiation. If, as now seems possible, the Southern Hemisphere were affected also, global disruption of the biosphere could ensue. In any event, there would be severe consequences, even in the areas not affected directly, because of the interdependence of the world economy. In either case, the extinction of a large fraction of the earth's animals, plants and microorganism seems possible. The population size of Homo sapiens conceivably could be reduced to prehistoric levels or below, and extinction of the human species itself cannot be excluded.

**86.** According to the passage, the argument against the use and manufacture of nuclear weapons __________ .

(1) is acceptable only on moral grounds

(2) becomes stronger if legal and moral considerations are combined

(3) does not stand the test of legality

(4) possesses legal strength although it does not have moral standing

---

**87.** The author's most important objective of writing the passage seems to __________ .

(1) highlight the use of nuclear weapons as an effective population control measure

(2) illustrate the devastating effects of use of nuclear weapons on mankind

(3) explain scientifically the climatic changes resulting from the use of nuclear weapons

(4) summarizing the long biological effects of use of nuclear weapons

---

**88.** Which of the following is/are the consequences of nuclear war ?

a. Lights would be cooler and more comfortable.

b. Fertility of land will last only for a year or so.

c. Post-war survivors, being very few, will have abundant food.

**Answer options :**

(1) Only a
(2) Only b
(3) Only c
(4) Only b and c

---

**89.** Choose the word which is the most opposite in meaning of the word given below in the passage.

deleterious

(1) beneficial
(2) revolutionary
(3) harmful
(4) irreparable

---

**90.** Which of the following best explains the word 'devoted' as used in the passage ?

(1) underutilised
(2) abused for destruction
(3) utilised for betterment
(4) dedicated for a good cause

**91.** The Paparazzi <u>tailed</u> them all over London.

Select the **correct** synonym for the underlined word.

(1) Followed (2) Troubled (3) Fought (4) Blackmailed

---

**92.** _________ means strength, energy, power, force and spirit.

(1) Victory (2) Calamity (3) Apology (4) Vigour

---

**93.** Write the **correct** form of verb in the given sentence :

"Each of these rooms _________ good enough for me."

(1) are (2) is (3) have (4) were

---

**94.** The barber has cut my hair very short.

Identify the **correct** progressive future tense form of the above sentence.

(1) The barber is cutting my hair very short.

(2) The barber will have cut my hair very short.

(3) The barber will be cutting my hair very short.

(4) The barber had cut my hair very short.

---

**95.** Today is not a special day on the _________ .

(1) calendar (2) calender (3) calander (4) calendor

---

**96.** Match the pairs :

| | I | | II |
|---|---|---|---|
| a. | Elegy | i. | A handwritten document |
| b. | Swan song | ii. | A song telling a popular story |
| c. | Manuscript | iii. | A poem addressed to a person/thing |
| d. | Ballad | iv. | A funeral song |
| e. | Ode | v. | The final performance of a person's career |

**Answer options :**

| | a | b | c | d | e |
|---|---|---|---|---|---|
| (1) | iv | v | i | ii | iii |
| (2) | iii | ii | i | v | iv |
| (3) | v | iv | i | ii | iii |
| (4) | ii | iii | i | iv | v |

---

**97.** a. The boat skimmed over the water.

b. She skimmed through the newspaper.

Identify the **correct** meaning of the underlined words in the respective contexts.

(1) Moved – Tossed

(2) Glided – Glanced

(3) Glanced – Removed

(4) Bounced – Flicked

---

**98.** Identify the unit of the following sentence that has an error :

Fine wood is used (a) for making (b) furnitures. (c)

**Answer options :**

(1) Only a (2) Only b (3) Only c (4) Only a and c

---

**99.** I note in my ________ whenever I take extra milk from the ________ .

Select the **correct** alternative to complete the sentence meaningfully.

(1) dairy – diary

(2) diary – dairy

(3) dairy – dairy

(4) dairy – dreary

---

**100.** a. She founded a refuge for mountain gorilla.

b. Kamala and her mother came to Mumbai as refugee during the Bengal drought.

Identify the **correct** meaning of the underlined words in their respective contexts.

(1) Sanctuary – Migrants

(2) Rubbish – Fugitive

(3) Migrant – Shelters

(4) Waste – Security

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

SEAL

क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**